# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल जि. रायगड — ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय ०२२ — २७४५८०४०/४१/४२
फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ — २७४५२३३९
उपायुक्त कार्यालय : ०२२ — २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com
वेबसाईट : panvelcorporation.maharashtra.gov.in

जा.क्र/प.महा/पर्या./३४२६/प्र.क्र.०३ / ४३ /२०२६

दिनांक : ०९ / ०७ /२०२६

## जाहीर दरपत्रके सूचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत खालील कामाकरीता जाहीर दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात मागविण्यात येत आहेत.

विषय - पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरण गणेशोत्सव २०२६ करिता महानगरपालिका क्षेत्रातील गणेश मूर्तिकारांना शाडूची माती उपलब्ध करून देणेबाबत जाहीर सूचनेद्वारे बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत .

पनवेल महानगरपालिकेमार्फत नोंदणीकृत आणि अनुभवी पुरवठादारांकडून सन २०२६ मध्ये पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२६ साजरा करण्याच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका अधिनस्त क्षेत्रातील गणेश मूर्तीकारांना शाडूची माती उपलब्ध करुन देणेबाबत जाहीर सूचनेद्वारे बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | कामाचा कालावधी | दर GST व इतर सर्व प्रचलित करांसहित |
|---|---|---|---|
| १ | • शुध्द शाडूच्या मातीचा पुरवठा करणे .<br>• शाडूच्या मातीचे वजन प्रति बॅग ४० किलोग्रॅम किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.<br>• शुध्द शाडूच्या माती बॅगचा पनवेल महानगरपालिका हद्दीत मूर्तिकारांच्या कारखान्याच्या ठिकाणी पोहोच/ पुरवठा करणे.<br>• शाडू माती गणेश मूर्ती बनवण्यासाठी योग्य असणे आवश्यक आहे.<br>• शाडू मातीचा पुरवठा दर हा शाडू माती बॅग मूर्तिकारांच्या कारखान्यात पोहच दर, वाहतूक खर्च, बॅग वाहनात भरणे व उतरणे मजुरी दर सह , GST व इतर सर्व प्रचलित करांसहित असावा. | १५ दिवस | |

सदरची दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात कार्यालयीन वेळेत दिनांक ०७ / ०७ /२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभागात सादर करावीत .

सदरची दरपत्रके ही कार्यालयीन वेळेत दिनांक ०७ / ०७ /२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उपायुक्त, पर्यावरण विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे दालनात उघडण्यात येतील.

१. उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

३. सदरच्या दरपत्रकांसोबत संस्था नोंदणी प्रमाणपत्र , GST नोंदणी प्रमाणपत्र , पॅनकार्ड , सदर विषयाशी संबंधित कामाचा कार्यादेश किंवा काम पूर्णत्वाचा दाखला इत्यादी कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही .

**सही /-**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**